# महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरण
## जनसंपर्क विभाग

कक्ष क्र. १९/२० तळ मजला, गृहनिर्माण भवन, कला नगर, वांद्रे पूर्व, मुंबई – ४०००५१.
दू.क्र. ०२२-६६४०५०६६/७७. ईमेल : cpromhadaoffice@gmail.com


=====================================================================

जावक क्रमांक – ५७६/१८ दिनांक :- १२ फेब्रुवारी, २०२५

प्रसिद्धिपत्रक

**म्हाडा कोकण मंडळातर्फे अंबरनाथ गृहनिर्माण प्रकल्पांसाठी मागणी निर्धारण सर्वेक्षण सुरू**

**नागरिकांनी २८ फेब्रुवारीपर्यंत सहभाग नोंदवण्याचे आवाहन**

मुंबई, दि. १२ फेब्रुवारी २०२५ :- म्हाडा कोकण मंडळातर्फे ठाणे जिल्ह्यातील अंबरनाथ येथील कोहोज खुंटवली व शिवगंगा नगर येथे अत्यल्प व मध्यम उत्पन्न गटांसाठी गृहनिर्माण प्रकल्प राबविण्यात येणार आहेत. या प्रकल्पांचा वर्धनक्षमता (Feasibility Report) अहवाल सादर करण्याआधी, संभाव्य मागणीचा अंदाज घेण्यासाठी मंडळातर्फे ऑनलाईन मागणी निर्धारण (Demand Assessment) सर्वेक्षण सुरू करण्यात आले आहे. नागरिकांनी मोठ्या संख्येने या सर्वेक्षणात सहभागी होऊन आपला अभिप्राय द्यावा, असे आवाहन म्हाडा कोकण मंडळातर्फे करण्यात आले आहे.

अंबरनाथमधील कोहोज खुंटवली येथे प्रस्तावित गृहनिर्माण प्रकल्पात अत्यल्प उत्पन्न गटासाठी १६०६ सदनिका व २२ दुकाने तर शिवगंगा नगर येथील प्रकल्पात अत्यल्प उत्पन्न गटासाठी १५१ व मध्यम उत्पन्न गटासाठी ७७४ सदनिका बांधण्यात येणार आहेत. या प्रकल्पांमध्ये नागरिकांकडून किती प्रतिसाद मिळू शकतो, हे जाणून घेण्यासाठी हे सर्वेक्षण करण्यात येत आहे.

२८ फेब्रुवारी २०२५ पर्यंत हे सर्वेक्षण सुरू राहणार असून, या ऑनलाईन सर्वेक्षणात सहभागी होण्यासाठी इच्छुक अर्जदारांनी https://demandassessmentcitizen.mhada.gov.in/ संकेतस्थळावर जाऊन अपेक्षित माहिती भरायची आहे. तसेच अधिक माहितीसाठी म्हाडा कोकण मंडळाच्या ०२२-६६४०५२४९ या दूरध्वनी क्रमांकावर संपर्क करण्याचे आवाहन मंडळाने केले आहे. ज्या ठिकाणी हे गृहनिर्माण प्रकल्प उभारले जाणार आहेत त्या ठिकाणाचे गूगल लोकेशन जाणून घेण्यासाठी क्यूआर कोडही तयार करण्यात आले आहेत.

कोहोज खुंटवली प्रकल्पाचे गूगल लोकेशन जाणून घेण्यासाठी https://maps.app.goo.gl/VjMSEFRLLUqzRWYZA या लिंकवर क्लिक करावे.

तसेच शिवगंगा नगर प्रकल्पाचे गूगल लोकेशन जाणून घेण्यासाठी https://maps.app.goo.gl/T4ye2UGMsbb2tRrSA या लिंकवर क्लिक करावे, असे आवाहन मंडळातर्फे करण्यात आले आहे.

###

(वैशाली गडपाले)
मुख्य जनसंपर्क अधिकारी / प्राधिकरण

---

सोशल मिडियावर आम्हाला फॉलो करा :

@mhadaofficial @mhadaofficial @mhadaofficial @mhadaofficial

**Maharashtra Housing & Area Development Authority**

<u>Public Relations Department</u>

Room No. 19/20, Ground Floor, Gruhnirman Bhavan, Kala Nagar, Bandra East, Mumbai-400051. Email : cpromhadaoffice@gmail.com

==========================================================================

Outward No. : 576/18 Dt. February 12, 2025

<u>Press Release</u>

# MHADA Konkan Board invites public participation in Housing Demand Survey for Ambarnath Projects

## Citizens encouraged to participate online by February 28 to help assess Housing Demand before project implementation

Mumbai, February 12, 2025 :- MHADA Konkan Board (a regional housing board of MHADA) has started an online Housing Demand Survey to understand public demand for its upcoming housing projects in Ambarnath. The survey will help in estimating the number of potential applicants before finalizing the feasibility report for these projects. Citizens are requested to participate in the survey by February 28, 2025.

MHADA plans to develop housing projects at Kohij Khuntavali and Shivganga Nagar in Ambarnath, offering homes for the Economically Weaker Section (EWS) and the Middle-Income Group (MIG). The proposed project at Kohij Khuntavali includes 1,606 housing units for EWS and 22 commercial shops, while the Shivganga Nagar project will have 151 units for EWS and 774 units for MIG.

The survey aims to assess the response from potential homebuyers, which will help MHADA in planning the project accordingly. Interested citizens can participate in the survey by visiting https://demandassessmentcitizen.mhada.gov.in and submitting the required details. For further information, citizens may contact the MHADA Konkan Board at 022-66405249.

To view the Google location of the proposed housing sites, QR codes have been generated. Citizens may visit https://maps.app.goo.gl/VjMSEFRLLUqzRWYZA for Kohij Khuntavali and https://maps.app.goo.gl/T4ye2UGMsbb2tRrSA for Shivganga Nagar. The MHADA Konkan Board urges citizens to take part in this survey to help in the planning of affordable housing projects in Ambarnath.

###

Vaishali Gadpale

Chief Public Relations Officer, MHADA